



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

मराठी विभाग २०२३-२४

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल

दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये शासन आदेशान्वये महाविद्यालयामध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या मुख्य उद्देशाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सर्वत्र साजारा केला जातो. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आमच्या महाविद्यालयात सुयोग्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दि.१८ जानेवारी रोजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या अनुशंगाने लिखाणाची आवड निर्माण व्हावी यासाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यातील निबंधाचे परीक्षण मराठी विभागातील सहाय्यक प्रा.डॉ.महेश रणदिवे यांनी करून तीन गुणानुक्रम काढले व एका उत्तेजनार्थ क्रमांक दिला.यामध्ये बीए भाग-३ची विद्यार्थिनी श्रद्धा उमेश सावंत हिने प्रथम क्रमांक, बीए भाग-३-चा विद्यार्थी ऋतिक कांबळे द्वितीय क्रमांक तर बी.कॉम भाग- तीन ची सुप्रिया काटमोरे तृतीय क्रमांक पटकावला. तसेच उत्तेजनार्थ मध्ये बीए भाग-तीनची राणी अशोक सकटे हिच्या निबंधांची निवड करण्यात आली.निबंध स्पर्धेत यश मिळविलेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे.

दि.२६ जानेवारी रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मराठी विभागामार्फत 'परिमल' या भित्तीपत्रक अंकाचे उद्घाटन करण्यात आले. या अंकामध्ये मराठी भाषेचे महत्त्व सांगणारे लेख, चारोळी, निबंध, मराठी भाषेचा इतिहास सांगणारे लेखन, कविता आदी साहित्याचा समावेश करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.एल.डी.कदम साहेब यांच्या हस्ते या अंकाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी मा.प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा व साहित्य याविषयी थोडक्यात मार्गदर्शन केले.

दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयाचा मराठी विभाग, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर. आणि महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी मातृभाषा, माझी स्वाक्षरी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला.

अशा प्रकारे दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान महाविद्यालयामध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला. हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वीपणे साजरा करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.एल.डी.कदम साहेब, सायन्स विभागाचे उपप्राचार्य प्रा.पी.एस चौगुले,कला व वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्या व मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

मराठी विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व प्रजासत्ताक दिन 'परिमल'अंक उद्घाटन फोटोग्राफी







## माझी मातृभाषा माझी स्वाक्षरी उपक्रम फोटोग्राफी






प्रा. डॉ. सिंधू जयवंत आबळे
मराठी, विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.